# खरिप हंगामासाठी शेतकऱ्यांना पीककर्ज, खते-बियाणे त्वरीत उपलब्ध करा : खासदार चंद्रकांत खैरे

## पीककर्जाचे उदिष्टे पूर्ण न करणाऱ्या बँकावर कारवाई करण्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**संभाजीनगर ( ता.१२ )** गारपीट, दुष्काळ यासारख्या भयंकर संकटांना सामोरे गेलेल्या शेतकऱ्यांना प्रशासनाने साथ देण्याची गरज असुन सध्याच्या खरिप हंगामासाठी शेतकऱ्यांना त्वरीत बॅकामार्फत पीककर्ज, सोसायट्याच्या मार्फत बि-बियाणे, खते यासारख्या आवश्यक सेवा उपलब्ध करण्याची सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी जिल्हाधिकरी विरेंद्र सिंह यांना केली. तसेच शिवसेना शिष्ट मंडळानी पीककर्ज पुर्ण न करणाऱ्या वित्तीय संस्था बॅका यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली.

या शिष्टमंडळात सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, नरेंद्र त्रिवेदी, आमदार संदिपान भुमरे यांची उपस्थिती होती. जिल्हात जलयुक्त शिवार अभियांनातर्गत सिमेंट बंधारे, नाले नदी साफसफाई, शेततवळे यासारख्या सिंचनाच्या योजनांचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा, गेल्या दोन वर्षापासुन शेतकऱ्यांना गारपीट, दुष्काळ, नैसर्गिक संकटे याची अद्याप ही काही शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयाने थेट बांधावर खत, हि योजना पुन्हा राबवावी, निकृष्ट बियाणे खते औषधी पुरवणाऱ्या दुकानावर कारवाई करुन शेतकऱ्यांना योग्य व माफक दरात सेवा देणाऱ्या विकेत्यांना सहकार्य करावे, ग्रामीण भागात संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, वृध्द कलावंत, निराधार, विधवा महिला यासारख्या तहसील मार्फत मोठ्या गोरगरीब जनतेमार्फत पोहचविण्याची यावेळी मागणी केली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकिस शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, गणेश चोपडे, रघुनाथ चव्हाण, बाबासाहेब जगताप, तालुकाप्रमुख डॉ. अण्णासाहेब शिंदे, अशोक शिंदे, अशोक शिंदे, रमेश बोरनारे, बप्पा दळवी, किशोर अग्रवाल, अंकुश सुंब, दत्ता गोर्डे, सोमनाथ परदेशी, शिवाजी बनकर, शिवाजी थेटे यांचा शिष्ट मंडळात समावेश होता.

शेतकऱ्यांना जोड व्यवसाय म्हणुन दुग्ध व्यवसाय गाई-म्हशी, शेळी, यासारख्या पुरक व्यवसायांना अनुदान व कर्ज देऊन शेतकरी व शेतमजुर, कामगार यांना आर्थिक सबलीकरण करावे, शेतकऱ्यांना मुलांना शैक्षणिक कर्ज, जिल्हा परिषद शाळांना मोफत पाठ्यपुस्तक बरोबर शैक्षणिक शुल्कातही माफक सुविधा द्याव्यात, जेणेकरुन दुष्काळाने व गारपीटाने ग्रस्त शेतकऱ्यांना प्रशासनाचा दिलासा मिळेल. शिवसेनेच्या माध्यमातुन आतापर्यत २० आत्महत्या शेतकऱ्यांना प्रत्येकी १ लाख रुपये मदत केली असुन उर्वरित मदतीपासुन वंचित शेतकऱ्यांना मदत करावी. जेणेकरुन त्यांच्या कुंटूंबियांना आधार मिळले या झालेल्या बैठकित जिल्हाधिकारी विरेंद्रसिंह यांनी आपण सर्वाशी समन्वय साधुन शेवटच्या शेतकऱ्यांपर्यत प्रशासनाची सेवा पुरविण्याची ग्वाही दिली. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी ही प्रशासनाला जनतेच्या सेवा त्वरीत व योग्य द्याल असा विश्वास व्यक्त केला.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400